श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्या नेपाळ येथील विदेश दौऱ्यास मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आस्था-२०१९/प्र.क्र.६२/का.१
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २७ मार्च, २०१९

संदर्भ-

१) परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे संदर्भ क्र. EPC२२०३१९४६१३६MCN, दिनांक २२ मार्च, २०१९ अन्वये केलेला अर्ज.

प्रस्तावना -

"मिशन शौर्य-२" अंतर्गत एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय व अनुदानित शाळांमधील निवडण्यात आलेल्या १४ आदिवासी विदयार्थ्यांची मांऊट एव्हरेस्ट मोहिम एप्रिल-मे २०१९ या कालावधीत प्रस्तावित आहे. सदर मोहीमेच्या अनुषंगाने तातडीच्या वैद्यकिय सोयी सुविधाबाबत बेस कॅंप, एव्हरेस्ट शिखर येथील वैद्यकिय अधिकाऱ्यांसोबत चर्चा करणे व काठमांडू येथे संबंधीत अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्याकरीता श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग व श्रीम. सिध्दी मोहटा, consultant, knowledge partnership and CSR या दिनांक १०.०४.२०१९ ते दिनांक २२.०४.२०१९ या कालावधीत काठमांडू, नेपाळ येथे जाणार आहेत. यानुषंगाने सदर विदेश दौऱ्यास केंद्र शासनाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडे दि.२२ मार्च, २०१९ च्या संदर्भ क्र.EPC२२०३१९४६१३६MCN अन्वये राजकिय मान्यता (Political Clearance) मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. त्यानुसार श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग व आयुक्त, आदिवासी विकास प्रशिक्षण व संशोधन संस्था, पुणे यांच्या आस्थापनेवरील श्रीम. सिध्दी मोहटा , consultant, knowledge partnership and CSR यांच्या विदेश दौऱ्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय -

श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग दिनांक १०.०४.२०१९ ते दिनांक २२.०४.२०१९ या कालावधीत "मिशन शौर्य-२" अंतर्गत एव्हरेस्ट शिखर सर करणे या मोहीमेच्या अनुषंगाने तातडीच्या वैद्यकिय सोयी सुविधाबाबत बेस कॅंप, एव्हरेस्ट शिखर येथील वैद्यकिय अधिकाऱ्यांसोबत चर्चा करणे व काठमांडू येथे संबंधीत अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्याकरीता नेपाळ

येथील विदेश दौऱ्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता शिफारस समितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने देण्यात येत आहे.

२. तसेच आयुक्त, आदिवासी विकास प्रशिक्षण व संशोधन संस्था, पुणे यांच्या आस्थापनेवरील श्रीम. सिध्दी मोहटा, consultant, knowledge partnership and CSR यांनाही सदर दौऱ्याकरीता याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर दौऱ्यासाठी येणारा खर्च मागणी क्र.टी-४, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा (०९०), सचिवालय (००) (०१), आदिवासी विकास विभाग (२२५१ ०२११)-१२, विदेश प्रवास खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० मध्ये उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय केंद्र शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांना नियमानुसार देय दैनिक व इतर भत्ते अनुज्ञेय राहतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२७१५०८४३२६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.03.27 15:13:25 +05'30'

(सु.ना.शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री (आ.वि.) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई,
३. मा.राज्यमंत्री (आ.वि.) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई,
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
९. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
१०.मा.मंत्री महालेखापाल (लेखा परीक्षा) , महाराष्ट्र-१, मुंबई

११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१३. अवर सचिव /कक्ष अधिकारी (कार्यासन ५ व ६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. लेखा अधिकारी, रोख शाखा, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. सर्व संबंधित अधिकारी
१६. निवड नस्ती.